Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near
Balchitrawani, Behind Agharkar Research
Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
स.न.८३२-ए,
फा.प्लॉ.नं.१७८;१७९,बालचित्रवाणी
शेजारी,आघारकर रिसर्च इन्स्टिटयूटच्या
मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 | EPABX -25705000 Fax : 25665807 |
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्वाचे / तातडीचे

क्रमांक : रा.मं./परीक्षा–३/६४४०
पुणे ४११००४.
दिनांक २८/११/२०२२

प्रति,
विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे.

**विषय**–फेब्रुवारी–मार्च २०२३ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या नियमित शुल्कास मुदतवाढ व विलंब शुल्काच्या तारखांबाबत.

संदर्भ :– १)क्र.रा.मं/परीक्षा–३/६०८९/दि.३.११.२०२२ .२) क्र : रा.मं./परीक्षा–३/६२४१/दि.१५.११.२०२२

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की,महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या फेब्रुवारी–मार्च २०२३परीक्षेस प्रविष्ठ होवू इच्छिणा–या विद्यार्थ्यांची परीक्षा आवेदनपत्रे त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखामार्फत ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.inया संकेतस्थळावर नियमित शुल्काने भरावयाची मुदत दिनांक दि.२५.११.२०२२ रोजी समाप्त झालेली आहे. तसेच दि. २६.११.२०२२ ते दि.३०.११.२०२२ पर्यंत विलंब शुल्काने भरावयाची होती. परंतु आवेदनपत्र भरण्याच्या संकेतस्थळामध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्याने चार–पाच दिवस इ.१२वी ची आवेदनपत्रे ऑनलाईन निर्धारित तारखांना भरता आलेली नाहीत. त्यामुळे खालीलप्रमाणे नियमित शुल्कास मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच विलंब शुल्काने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयामार्फत **शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे** SARAL Database**वरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा तसेच** व्यवसाय अभ्यासक्रम HSC vocationalStreamशाखांचे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय, ITI(औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Creditघेणारे विद्यार्थी) विद्यार्थ्यांची नियमित शुल्काने आवेदनपत्रे भरावयाच्या मुदतवाढीच्या तारखा व विलंब शुल्काने भरावयाच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन काढून शुल्क बँकेत भरावयाची मुदत |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| नियमित शुल्क | बुधवार दि.३०.११.२०२२ पर्यंत | सोमवार दि.०५.१२.२०२२ पर्यंत |
| विलंब शुल्क | गुरूवार दि. ०१.१२.२०२२ ते शुक्रवार दि. ०२.१२.२०२२ (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | |

उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परीक्षा शुल्क RTGSद्वारे भरणा केल्याच्या RTGS/NEFT पावत्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व प्रीलिस्ट जमा करावयाची तारीख बुधवार , दि.०७/१२/२०२२ आहे यामध्ये कोणताही बदल नाही याची नोंद घ्यावी.

नियमित शुल्काने तसेच विलंब शुल्काने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अतिविलंब शुल्काने आवेदनपत्रे भरण्याच्या तारखा यथावकाश कळविण्यात येतील.

सदरची बाब विभागीय मंडळाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून कार्यक्षेत्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख व सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणावी.

(अनुराधा ओक)
सचिव
राज्य मंडळ, पुणे ०४.

**कोविमं./12 वी परीक्षा/ 2429**
**दिनांक:-28/11/2022**

**प्रति,**
**प्राचार्य**
**सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये, (सातारा/सांगली/कोल्हापूर)**

**विषय-फेब्रुवारी-मार्च 2023मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षेची नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईल सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देणे व चलन Download करुन भरण्याच्या व प्रि-लिस्ट, विद्यार्थी यादी जमा करणेच्यातारखांबाबत.**

**उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने फेब्रुवारी/मार्च 2023 मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी ) परीक्षेच्या ऑनलाईन आवेदनपत्रे सादर करण्याबाबतच्या पत्रानुसार आवश्यक कार्यवाही करावी आणि दि.07/12/2022 रोजी विद्यार्थ्यांच्या प्रिलिस्ट,चलने आणि एक्सेल यादी तसेच पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची यापूर्वीच्या परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत,पिलिस्ट दुरुस्ती पाकिटे वितरण केंद्रावर जमा करावयात. व वितरण केंद्रांनी दि.08/12/2022 रोजी मंडळाकडे जमा करा वयाची आहेत.**

**विभागीय सचिव**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापर,**

Panwalkar/Circular